24 MAY 2023
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांच्या क्षमतांना वाव द्या

## डॉ. पी. एस. पाटील : समाजशास्त्र परिषदेत 'जीवनगौरव'चे वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांत महिलांच्या क्षमतांना हिमनगासारखा केवळ २० टक्केच वाव मिळाला आहे. महिलांच्या या क्षमतांना वाव मिळाला तर त्या हिमालयासारख्या दिसतील व समाज अधिक सुदृढ बनेल, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केला.




शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या श्री शहाजी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र परिषदेचे चौदावे अधिवेशन झाले. यावेळी प्रा. आर. बी. पाटील, डॉ. एन. डी. जत्राटकर, डॉ. रमेश जाधव, प्रा. एस. डी. अकोळे यांना समाजशास्त्राचे ज्येष्ठ प्राध्यापक एस. एन. पवार यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला.

शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र परिषदेचे चौदावे अधिवेशन सोमवारी (दि.२२) झाले. उद्घाटनप्रसंगी पाटील प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते. समाजशास्त्र परिषदेच्या वतीने दिला जाणारा जीवनगौरव पुरस्कार प्रा. आर. बी. पाटील, डॉ. एन. डी. जत्राटकर, डॉ. रमेश जाधव, प्रा. एस. डी. अकोळे यांना समाजशास्त्राचे ज्येष्ठ प्राध्यापक एस. एन. पवार यांच्या हस्ते प्रदान केला. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या अध्यक्षा डॉ. प्रतिमा परदेशी यांनी मनोगत व्यक्त केले. समन्वयक डॉ. के. एम. देसाई यांनी स्वागत केले. परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे यांनी प्रास्ताविक केले. परिषदेसाठी २५ हजार रुपयांची देणगी त्यांनी यावेळी घोषित केली. जीवन गौरव पुरस्कारप्राप्त प्राध्यापकांनीही यावेळी प्रत्येकी दहा हजार रुपयांची देणगी दिली.

24 MAY 2023 लोकमत
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात साकारणार मत्स्यालय, जल-जैवविविधता केंद्र

## कोकण कृषी विद्यापीठासमवेत सामंजस्य करार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ व दापोली (जि. रत्नागिरी) येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या वतीने शिवाजी विद्यापीठात मत्स्यालय आणि जल-जैवविविधता केंद्र साकारण्यात येणार आहे. या दोन्ही विद्यापीठात नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. कृषी विद्यापीठासह त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांचेही यासाठी सहकार्य लाभणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या जलस्रोतांमध्ये (विद्यापीठ परिसरातील तळी). विविध प्रकारचे मासे, जलचर यांचे संवर्धन करण्यात येणार आहे. यामुळे तळ्यातील पाणी निसर्गतः स्वच्छ राहील आणि पाण्यामधील अन्नसाखळी समृद्ध होईल. यासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाशी संलग्नित रत्नागिरी मत्स्यविज्ञान महाविद्यालयाचे सहकार्य लाभणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात भव्य मत्स्यालय व जल-जैवविविधता केंद्र निर्माण करण्यासाठीही कोकण कृषी विद्यापीठाकडून तांत्रिक मार्गदर्शन लाभणार आहे. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ यांच्या संशोधकांना औषधी वनस्पतींचे जैवरासायनिक पृथक्करण, औषधी वनस्पती तसेच जंगलात आढळणाऱ्या वनस्पतींचे टिश्यू कल्चरद्वारे पुनरुज्जीवन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ सहकार्य करणार आहे.

> कृषी विद्यापीठ व अकृषी विद्यापीठांमध्ये होणारा हा सामंजस्य करार वेगळ्या स्वरुपाचा असून, दोन्ही विद्यापीठांतील सर्व घटकांच्या संशोधनात्मक व शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी निश्चितपणे उपयुक्त ठरेल.
>
> **- डॉ. दिगंबर शिर्के**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

या सामंजस्य करारामुळे वन्यविज्ञान महाविद्यालय, दापोली व औषधी वनस्पतींवर संशोधन करणाऱ्या कृषी विद्यापीठातील संशोधकांना शिवाजी विद्यापीठातील समृद्ध उपकरण कक्ष, प्रयोगशाळा व संशोधकांच्या ज्ञानाचा लाभ होईल, असे मत कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत यांनी व्यक्त केले.

या सामंजस्य करारप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्राणिशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख, डॉ. अधिकराव जाधव उपस्थित होते. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. भावे, मत्स्यविज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता प्रा. शिंगारे, वनशास्त्र महाविद्यालय दापोलीचे डॉ. अजय राणे ऑनलाइन उपस्थित होते. डॉ. भिलावे यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 4 MAY 2023
पुढारी

# विद्यापीठात साकारणार मत्स्यालय, जल-जैव-विविधता केंद्र

## डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठासमवेत सामंजस्य करार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

दापोली (जि. रत्नागिरी) येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठासमवेत शिवाजी विद्यापीठाचा अध्यापन, संशोधन व विस्तार कार्यासाठी सामंजस्य करार झाला. या करारामुळे शिवाजी विद्यापीठात मत्स्यालय व जल-जैवविविधता केंद्र साकारणार आहे.

शिवाजी विद्यापीठ जलस्वयंपूर्ण आहे. येथील जलस्रोतांमध्ये विविध प्रकारचे मासे, जलचर यांचे संवर्धन करणे, तळ्यातील पाणी निसर्गत: स्वच्छ राहील व पाण्यामधील अन्नसाखळी समृद्ध होईल, या दृष्टीने कोकण कृषी विद्यापीठाशी संलग्नित मत्स्यविज्ञान महाविद्यालय, रत्नागिरी यांचे सहकार्य व तांत्रिक मार्गदर्शन लाभणार आहे. शिवाजी विद्यापीठ डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या संशोधकांना औषधी वनस्पतींचे जैव-रासायनिक



पृथक्करण, औषधी वनस्पती व जंगलात आढळणाऱ्या पण संख्येने कमी प्रमाणात असणाऱ्या वनस्पतींचे टिश्यू कल्चरद्वारे पुनरूज्जीवन करण्यासाठी मार्गदर्शन करणार आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, दोन्ही विद्यापीठांतील सर्व घटकांच्या संशोधनात्मक व शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी निश्चितपणे उपयुक्त ठरेल. सामंजस्य करारामुळे वन्यविज्ञान महाविद्यालय, दापोली व औषधी वनस्पतींवर संशोधन करणाऱ्या कृषी विद्यापीठातील संशोधकांना शिवाजी विद्यापीठातील समृद्ध उपकरण कक्ष, प्रयोगशाळा व संशोधकांच्या ज्ञानाचा लाभ होईल, असे मत कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत यांनी ऑनलाईन उपस्थित राहून व्यक्त केले.

सामंजस्य करार प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख, डॉ. अधिकराव जाधव उपस्थित होते. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत, वनशास्त्र महाविद्यालय दापोलीचे डॉ. अजय राणे आदी ऑनलाईन उपस्थित होते. डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
24 MAY 2023
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सिनेमासाठी सामाजिक प्रश्नांकडे डोळसपणे पाहण्याची गरज

## मिथुनचंद्र चौधरी : डॉ. ग. गो. जाधव अध्यासनात दोन कोर्सची सुरुवात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

दीर्घकाळ टिकणारा सिनेमा बनवायचा असेल तर समाजातील प्रश्नांकडे डोळसपणे पाहण्याची दृष्टी व संवेदनशील मन जोपासले पाहिजे, असे प्रतिपादन सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या ऑडिओ व्हिज्युअल प्रोग्राम विभागाचे प्रमुख मिथुनचंद्र चौधरी यांनी केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे सुरू असलेल्या दोन कोर्सच्या प्रारंभप्रसंगी दिग्दर्शक मिथुनचंद्र चौधरी यांचे स्वागत करताना दिग्दर्शक सचिन सूर्यवंशी. शेजारी डॉ. शिवाजी जाधव.**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनामधील डॉक्युमेंट्री फोटोग्राफी आणि शॉर्ट फिल्म मेकिंग अभ्यासक्रमाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. फिल्मफेअर पुरस्कारप्राप्त दिग्दर्शक सचिन सूर्यवंशी अध्यक्षस्थानी होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव प्रमुख उपस्थित होते.

चौधरी म्हणाले, चांगल्या आशयाचा सिनेमा दीर्घकालीन टिकतो व समाजामध्ये आपोआपच रुजतो. आपल्या अंगी संवेदनशील मन असेल तरच संवेदनशील सिनेमाची निर्मिती होऊ शकते. सिनेमाच्या निर्मितीकडे वळण्यासाठी वाचन, संशोधन, नृत्य, नाटक, कला, संगीत आदींचे ज्ञान मिळवणे, कॅमेरा हाताळण्याची कला आत्मसात करणे आवश्यक आहे.

सचिन सूर्यवंशी म्हणाले, पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी आवडीच्या क्षेत्राचे अधिकाधिक ज्ञान आत्मसात करावे. खडतर परिस्थितीवर मात करून ज्ञानाच्या जोरावर यश मिळवावे.

याप्रसंगी चौधरी यांची निर्मिती असलेला 'पायवाट' हा राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त लघुपट दाखवण्यात आला. यावेळी पत्रकारिता विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, चित्रपट अभ्यासक डॉ. अनमोल कोठाडिया, स्टोरी बोर्ड रायटर स्वप्नील पाटील, अभिजित गुजर, आर.जे. पूजा आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन पुष्पा पाटील यांनी केले. आकाश कुलकर्णी यांनी आभार मानले.

24 MAY 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देशाच्या शाश्वत विकासाचे तरुण ग्रोथ इंजिन

## प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील; विद्यापीठात राष्ट्रीय युवा संसद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

तरुण राष्ट्रीय शाश्वत विकासाचे 'ग्रोथ इंजिन' आहेत. त्यामुळे तरुणांनी मूल्याधिष्ठित जाणीवा मनाशी बाळगून राष्ट्र विकासाच्या कार्यात सहभाग घ्यावा, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात १६ राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेतर्गत राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा पार पडली. उद्घाटन समारंभप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. स्पर्धेचे निरीक्षक म्हणून केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव ए. बी. आचार्य, शिक्षणतज्ज्ञ प्रा. एस. बी. देओसकर उपस्थित होते. याप्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड उपस्थित होते.



राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. प्रल्हाद माने, प्रा. एस. बी. देओसकर आदी.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, राष्ट्रीय युवा संसद उपक्रमाच्या माध्यमातून सांविधानिक लोकशाहीची मूल्ये युवा पिढीमध्ये रुजविण्याच्या दिशेने केंद्रीय मंत्रालय प्रयत्न करीत आहे. उपक्रमातून युवा पिढीच्या व्यक्तिमत्त्वाला नवे आयाम प्राप्त होतात. त्यांचे भवितव्यही मूल्याग्रही बनते. या माध्यमातून भारताची विविधतेमधील एकता आणि बहुसांस्कृतिकतेमधील एकात्मताही युवकांच्या जाणीवेच्या कक्षेमध्ये रुजतात. यातून भारताचा चांगला नागरिक म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होत आहे.

युवा संसदेमध्ये तासभर विविध विषयांवर चर्चा झाली. विद्यार्थ्यांनी 'स्वच्छ भारत'ची शपथ घेतली. समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संतोष सुतार यांनी आभार मानले.

पुढारी

# विद्यापीठ : ५५१ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर-२०२२ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ५६४ अभ्यासक्रमांपैकी ५५१ अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर घोषित झाले आहेत. २३ मे रोजी बीएड, एमएड (इंटिग्रेटेड), मास्टर ऑफ फार्मसी सत्र १ व २ या अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संगीत नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांना तबला वादनाविषयी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. रविकिरण नाकोड.

# रियाजासाठी ध्यान करणे आवश्यक

## डॉ. नाकोड; विद्यापीठात दोनदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

रियाजासाठी बैठक आवश्यक असते. एका जागी अधिक वेळ बसता येणे गरजेचे असते. एकाच गोष्टीचा वारंवार रियाज करण्यासाठी ध्यान आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी ध्यान करण्याकडे लक्ष द्यावे, असे प्रतिपादन सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ कर्नाटकच्या डिपार्टमेंट ऑफ म्युझिक अँड आर्टस् येथील तबला विषयाचे प्रा. डॉ. रविकिरण नाकोड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ संगीत नाटयशास्त्र अधिविभागातर्फे 'कन्सेप्टस् ऑफ रियाज इन तबला' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. डॉ. नाकोड यांनी विद्यार्थ्यांना तबला वादनाविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी अनेक कायदे, पलटे, रियाजासाठी आवश्यक अक्षर साधना विद्यार्थ्यांना शिकविली. कार्यशाळेच्या शेवटी त्यांचे एकल वादनही झाले. कार्यशाळेचे प्रास्ताविक अधिविभागातील प्रा. डॉ. निखिल भगत यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी केले. आअतुल परीट यांनी आभार मानले.

पुढारी

# 'बीएस्सी बीएड एकात्मिक'चा प्रस्ताव 'एनसीईआरटी'ला पाठवणार

## विद्यापीठ व्यवस्थापन परिषद बैठकीत ठराव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील बीएस्सी, बीएड एकात्मिक कोर्ससाठी 'एनसीईआरटी'कडून मान्यता मिळविण्यासाठीचा ठराव मंगळवारी शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद बैठकीत करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या ऑनलाईन उपस्थितीत झाली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते. बैठकीत विद्यापीठाकडून मंजूर ७२ पदांपैकी काही पदे आजीवन अध्ययन व संचालकपदाची आहेत, याबाबतच्या त्रुटी प्रस्तावास मान्यता देण्यात आली. कोरोना काळात विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने ज्या विद्यार्थ्यांचे पालक मृत्यू पावले आहेत, अशांना ७५ हजार रुपये देण्यात येत होते.

काही संलग्न महाविद्यालयांची प्रस्ताव पाठविण्याची मागणी होती. ते प्रस्ताव पाठविण्यास पुन्हा दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. खरेदी-विक्री समितीने मांडलेल्या खरेदीचा विषय मोठा असल्याने पुढील बैठकीत त्यावर चर्चा करण्याचा निर्णय झाला. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, प्रा. रघुनाथ ढमकले, पृथ्वीराज पाटील, सिद्धार्थ शिंदे आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# सिनेमासाठी सामाजिक प्रश्नांकडे डोळसपणे पाहा

## मिथुनचंद्र चौधरी : डॉ. ग. गो. जाधव अध्यासनात दोन कोर्सचा प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दीर्घकाळ टिकणारा सिनेमा बनवायचा असेल तर समाजातील प्रश्नांकडे डोळसपणे पाहण्याची दृष्टी आणि संवेदनशील मन जोपासले पाहिजे, असे प्रतिपादन सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या ऑडिओ व्हिज्युअल प्रोग्राम विभागाचे प्रमुख मिथुनचंद्र चौधरी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनामधील डॉक्युमेंटरी फोटोग्राफी आणि शॉर्ट फिल्म मेकिंग अभ्यासक्रमाचा प्रारंभ चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. फिल्म फेअर पुरस्कारप्राप्त दिग्दर्शक सचिन सूर्यवंशी अध्यक्षस्थानी होते, तर अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव प्रमुख उपस्थित होते. मिथुनचंद्र चौधरी म्हणाले, प्रत्येक व्यक्तीला सिनेमाची भूक असते. ही भूक ओळखली गेल्यामुळेच शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनामध्ये माहितीपट, सिनेमा निर्मितीचा अभ्यासक्रम सुरू झाला आहे, ही विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत चांगली बाब आहे. चौधरी म्हणाले, चांगल्या आशयाचा सिनेमा दीर्घकाल टिकतो आणि समाजामध्ये आपोआपच रुजतो. चांगला सिनेमा बनवण्यासाठी संवेदनशील मन, ऐकण्याची क्षमता, समाजातील प्रश्नांकडे बघण्याची दृष्टी, मोकळे आणि असंकुचित मन, वैयक्तिक अनुभवांकडे बघण्याचा दृष्टिकोन अशा काही मूलभूत बाबींची गरज असते. आपल्या अंगी संवेदनशील मन असेल तरच संवेदनशील सिनेमाची निर्मिती होऊ शकते.

> विविध भागांतून आलेली सर्वसामान्य कुटुंबातील मुले शिवाजी विद्यापीठात शिक्षण घेत आहेत. पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्राचे अधिकाधिक ज्ञान आत्मसात करावे. खडतर परिस्थितीवर मात करून ज्ञानाच्या जोरावर यश मिळवा, असा मूलमंत्र अध्यक्षस्थानावरून बोलताना सचिन सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना दिला. प्रास्ताविक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले.

सिनेमाच्या निर्मितीकडे वळण्यासाठी वाचन, संशोधन, नृत्य, नाटक, कला, संगीत आदींचे ज्ञान मिळवणे, कॅमेरा हाताळण्याची कला आत्मसात करणेही आवश्यक असल्याचे चौधरी यांनी सांगितले.

24 MAY 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाणीटंचाई आणि पर्यावरण!



भोवताल

डॉ. व्ही.एन. शिंदे

भारतात ऋतू कोणताही असो, पाणी बातमीचा विषय असतो. पावसाळ्यात पाऊस कधी येणार, पावसाळ्यात अवर्षण, पूर, ढगफुटी, विविध रूपात पाऊस आणि पाणी बातम्यांचा विषय बनतो. हिवाळ्यात पिकाला कालव्यात पाणी सोडावे, पिकाला ओढ बसून शेतकऱ्याचे नुकसान, अशा बातम्या सुरू होतात. उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या बातम्या येतात. नद्या कोरड्या पडतात. तलाव कोरडे पडल्याच्या बातम्या येतात. कोयना धरणाजवळील २८ गावांत पाणीटंचाई ही नुकतीच आलेली बातमी. मागील वर्षी महाराष्ट्रात भरपूर पाऊस पडला. नद्यांना पूर आले. तलाव काठोकाठ भरले. तरीही उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या बातम्या येत आहेत. आता पावसाळ्याची चाहूल लागत आहे. आताच पर्यावरणाचे नुकसान टाळून पाणीटंचाई होऊ नये, यासाठी प्रयत्न करायला हवेत.

पाऊस भरपूर पडला तरी महाराष्ट्रात पाणीटंचाई का होते, याचा विचार करायला हवा. सरासरी जगाच्या तुलनेत भारतात आणि भारताच्या तुलनेत महाराष्ट्रात पाऊस जास्त पडतो. तरीही महाराष्ट्रात पाणीटंचाई ठरलेली आहे. यामागे महत्त्वाचे कारण आहे ते म्हणजे झाडांचे घटलेले प्रमाण. एकूणच भारतातील, महाराष्ट्रातील जंगलांचे प्रमाण खूप कमी झाले. बांधावरची, नद्यांच्या काठावरील झाडांचे प्रमाण घटले आहे. झाडांच्या आणि जंगलाच्या घटलेल्या प्रमाणामुळे जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाण घटले. जमिनीतील पाणी उपसण्याचे प्रमाण प्रचंड आहे. शेतीला वापरल्या जाणाऱ्या पाण्यातील ७० टक्के पाणी विहिरी आणि कूपनलिकांमधून उपसण्यात येते. जेवढे पाणी वर्षभर उपसले जाते, तेवढे पाणी पुन्हा जमिनीत जाणे, मुरणे आवश्यक असते. मात्र, तसे होत नाही, ही दुर्दैवाने वस्तुस्थिती आहे.

नद्यांवर बांधलेले तलाव हे दुसरे कारण सांगण्यात येते. मात्र, हे कारण तितकेसे खरे नाही. कारण तलावांमध्ये पाणी साठवले नसते, तर त्यातील मोठा हिस्सा समुद्राला जाऊन मिळाला असता. शहरांना त्यामुळे पाणीपुरवठा करता आला नसता. शेतीला पुरेसे पाणी मिळाले नसते. आज जेवढे क्षेत्र हिरवे दिसते, त्याच्यापेक्षा एक तृतीयांश क्षेत्र कमी झाले असते. त्यामुळे तलावांमुळे पाणीटंचाई होत नाही. नद्या लवकर कोरड्या पडतात. मात्र, नद्या कोरड्या होण्यामागे केवळ हेच कारण आहे असे नाही. नद्यांच्या काठावर असणारे झाडांचे घटलेले प्रमाण हे महत्त्वाचे कारण आहे.

नद्या कोरड्या होण्यामागे आणखी महत्त्वाचे कारण म्हणजे नद्यातून होणारा अमर्याद वाळू उपसा हे आहे. नद्यातील वाळू अनेक अर्थांनी महत्त्वाची आहे. जैवविविधतेपासून पाण्याला जतन करून ठेवण्याचे काम वाळू करते. नद्यांच्या पात्रातील वाळू नैसर्गिक पर्यावरणीय रचनेचा भाग असते. ही वाळू सिमेंटच्या बांधकामासाठी महत्त्वाची. बांधकाम व्यवसायाला सुगीचे दिवस आल्यापासून नद्यांतील वाळू उपसा सुरू आहे. वाळू उपसण्याची शासनामार्फत रितसर निविदा काढण्यात येते. नदीतून किती वाळू उपसावी याचे प्रमाण सांगण्यात आलेले असते. अर्थात तेही कोणत्या बाबींचा विचार करून ठरवलेले असते, हे जाहीर होत नाही. या अधिकृत वाळू उपशाबद्दल सरकारला रॉयल्टी भरणे आवश्यक असते. मात्र, जेवढी वाळू उपसणे आवश्यक असते त्यापेक्षा कितीतरी जास्त प्रमाणात वाळूचा उपसा होतो. असा अवैध वाळू उपसा मोठ्या प्रमाणात होतो. अवैध वाळू उपसा थांबवण्यासाठी काही अधिकारी प्रामाणिक प्रयत्न करतात. मात्र, अशा अधिकाऱ्यांना वाळू माफियांच्या रोषाला बळी पडावे लागते.

वाळू नदीचा प्राण असते. वाळू नदीतील पाण्याला स्वच्छ ठेवण्याचे काम करते. वाळूने पकडून ठेवलेल्या पाण्यामध्ये अनेक जीव



आपला उन्हाळा व्यवस्थित घालवतात. मात्र, खालच्या माती किंवा खडकापर्यंत वाळूचा उपसा झाल्यानंतर यातील जीव टिकून राहू शकत नाहीत. त्यामुळे नद्यांची पर्यावरणीय रचनाच बदलली आहे. यातून नद्या मृत होत चालल्या आहेत. नद्यांची रचना, त्यांचा उगम, पाणलोट क्षेत्र, त्यावर असणारे पाणीसाठे, नद्यांचा प्रवाह, नद्यांमधील पाण्याचा प्रवाह, पाण्याचे प्रमाण या सर्व बाबींचा विचार करून त्यांचे संवर्धन आणि जतन करण्याचे धोरण ठरवणे आवश्यक असते. वस्तुस्थितीत मात्र तसे होताना दिसत नाही.

नद्या कोरड्या पडल्यामुळेच नाही, तर नद्यांतील पाणी प्रदूषित झाल्याने पाणीटंचाई झाल्याचे उदाहरण म्हणजे पंचगंगा नदी आहे. नद्यांमध्ये नागरी वस्त्यांमधील वापरलेले पाणी, कारखान्यातील प्रदूषित पाणी नाल्यांमधून, ओढ्यांमध्ये आणि ओढ्यातून नदीच्या पात्रात येते. मुळात शहरातील पूर्वी असणाऱ्या नद्यांचे आज गटारात रूपांतर झाले आहे. शहरातील सर्व सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता, गटारातून नाल्यात, नाल्यातून ओढ्यात आणि ओढ्यातून नदीत येते. या पाण्यामुळे नद्यांतील जैवविविधता संपुष्टात आली आहे. निसर्गात पाणी स्वच्छ ठेवणारी यंत्रणा कार्यान्वित असते. एका विशिष्ट पातळीपर्यंत पाण्यामध्ये प्रदुषके असतील तर, ही नैसर्गिक यंत्रणा सक्षमपणे कार्य करते. पाण्यामध्ये हायड्रीला, शैवाल आणि विविध प्रकारचे मासे, कासव, बेडूक अशा जलचरांमुळे, उभयचरांमुळे जलसाठे स्वच्छ राहत असतात. या सर्व यंत्रणा आज निकामी झाल्या आहेत. नद्यांमध्ये मिसळणाऱ्या पाण्यांमध्ये मल-मूत्रमिश्रीत पाण्याबरोबर साबणाचे, रसायनांचे पाणी मिसळलेले असते. त्याचा परिणाम जलप्रवाहातील जैवसृष्टीवर झाला आहे. त्यामुळे ज्या पंचगंगेच्या पात्रातील पाणी कोल्हापूर शहराला पिण्यासाठी पुरवले जाते, त्याच पंचगंगेतील पाणी इचलकरंजी शहराला वापरण्यासाठीही घेता येत नाही.

इतर नद्यांची अवस्था यापेक्षा बिकट आहे. त्या नद्यांमध्ये पाणी केवळ पावसाळ्यात वाहत असते. हिवाळा सुरू झाला की हा प्रवाह आटतो. त्यामध्ये काही ठिकाणी पाणी असते. मात्र, वाळू उपशामुळे त्यालाही ग्रहण लागले आहे. पाण्याचा अमर्याद वापर हेही पाणीटंचाईचे महत्त्वाचे कारण आहे. मोठ्या प्रमाणात पाऊस पडणारा आणि सर्वाधिक धरणे असलेल्या इगतपुरी तालुक्यालाही पाणीटंचाई जाणवते. मालेगाव शहराला दोन दिवसाआड पाणी पुरवण्यात येते. लातूर शहराला आजही सात दिवसातून एकदा पाणी पुरवण्यात येते. पुणे शहरालाही एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येतो. याला मूळ कारण नद्यांमध्ये पाण्याचा प्रवाह नसणे, जमिनीतील पाणी अमर्याद उपसणे, वाढते काँक्रिटीकरण अशा अनेक कारणांमुळे पाणीटंचाई वाढत आहे.

भविष्यात पाणीटंचाई संपणे अवघड आहे. मात्र, पाणीटंचाईची तीव्रता कमी करता येणे शक्य आहे. त्यासाठी शक्य असेल तेथे झाडांची लागवड करायला हवी. आज पडणाऱ्या पावसाच्या पाण्यातील १० टक्के पाणी जमिनीत मुरते, १७ टक्के पाण्याची वाफ होते, ६७ टक्के पाणी समुद्राला जाऊन मिळते. आज आपण केवळ सहा टक्के पाण्याची साठवण करतो. पाण्याची टंचाई संपवायची असेल तर पळणाऱ्या पाण्याला थांबवण्याची आणि थांबलेल्या पाण्याला जमिनीत मुरवण्याची गरज आहे.

vilasshindevs44@gmail.com

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 4 MAY 2023
सकाळ

# तरुण पिढी देशाच्या शाश्वत विकासाचे 'ग्रोथ इंजिन'

## डॉ. प्रमोद पाटील; शिवाजी विद्यापीठात १६ वी राष्ट्रीय युवा संसद

**कोल्हापूर, ता. २३ :** 'तरुण पिढी ही राष्ट्रीय शाश्वत विकासाचे 'ग्रोथ इंजिन' आहे. त्यामुळे तरुणांनी मूल्याधिष्ठित जाणिवा मनाशी बाळगून राष्ट्रविकासाच्या कार्यात सहभाग घ्यावा', असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठात १६ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेअंतर्गत राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा पार पडली. या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या सभागृहातील स्पर्धेस निरीक्षक म्हणून केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव ए.बी. आचार्य आणि शिक्षणतज्ज्ञ प्रा. एस. बी. देओसकर उपस्थित होते.



**कोल्हापूर : उद्घाटनप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी मार्गदर्शन केले. डावीकडून प्रल्हाद माने, एस. बी. देओसकर, ए. बी. आचार्य, विलास शिंदे, प्रकाश गायकवाड आदी उपस्थित होते.**

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, की राष्ट्रीय युवा संसद उपक्रमाच्या माध्यमातून सांविधानिक लोकशाहीची मूल्ये युवा पिढीमध्ये रुजविण्याच्या दिशेने केंद्रीय मंत्रालय अतिशय सकारात्मक प्रयत्न करीत आहे. हा उपक्रम देशभरातील विद्यापीठांमध्ये राबविला जातो. यामुळे युवा पिढीच्या व्यक्तिमत्त्वाला नवे आयाम प्राप्त होतात, तसेच त्यांचे भवितव्यही मूल्याग्रही बनते. या माध्यमातून भारताची विविधतेमधील एकता आणि बहुसांस्कृतिकतेमधील एकात्मताही युवकांच्या जाणिवेच्या कक्षेमध्ये रुजतात. यातून भारताचा चांगला नागरिक म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होते.

कार्यक्रमास प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड आदी उपस्थित होते. समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संतोष सुतार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 MAY 2023

# शिवाजी विद्यापीठात साकारणार मत्स्यालय, जल-जैवविविधता केंद्र

## डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाबरोबर सामंजस्य करार

कोल्हापूर, ता. २३ : दापोली (जि. रत्नागिरी) येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाबरोबर शिवाजी विद्यापीठाचा अध्यापन, संशोधन व विस्तार कार्यासाठी सामंजस्य करार झाला. या करारान्वये शिवाजी विद्यापीठात मत्स्यालय आणि जल-जैवविविधता केंद्र साकारण्यासाठी कृषी विद्यापीठासह त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांचे सहकार्य लाभणार आहे.

शिवाजी विद्यापीठातील जलस्रोतांमध्ये (विद्यापीठ परिसरातील तळी) विविध प्रकारचे मासे, जलचर यांचे संवर्धन करणे, ज्यायोगे तळ्यातील पाणी निसर्गतः स्वच्छ राहील आणि पाण्यामधील अन्नसाखळी समृद्ध होईल, या दृष्टीने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाशी संलग्नित मत्स्यविज्ञान महाविद्यालयाचे (रत्नागिरी) सहकार्य आणि मार्गदर्शन विद्यापीठास लाभणार आहे. कृषी विद्यापीठ यांच्याकडून तांत्रिक मार्गदर्शन लाभणार आहे.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी यावेळी कृषी विद्यापीठ व अकृषी विद्यापीठांमध्ये होणारा हा सामंजस्य करार वेगळ्या स्वरूपाचा असून, दोन्ही विद्यापीठांतील सर्व घटकांच्या संशोधनात्मक व शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी निश्चितपणे उपयुक्त ठरेल, अशी भावना व्यक्त केली.

'या सामंजस्य करारामुळे वन्यविज्ञान महाविद्यालय, दापोली व औषधी वनस्पतींवर संशोधन करणाऱ्या कृषी विद्यापीठातील संशोधकांना शिवाजी विद्यापीठातील समृद्ध उपकरण कक्ष, प्रयोगशाळा व संशोधकांच्या ज्ञानाचा लाभ होईल', असे मत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत यांनी ऑनलाईन उपस्थित राहून व्यक्त केले. या करारावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्राणिशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख, डॉ. अधिकराव जाधव उपस्थित होते. तर कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत, संशोधन संचालक डॉ. भावे, मत्स्यविज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता प्रा. शिंगारे, वनशास्त्र महाविद्यालय दापोलीचे डॉ. अजय राणे ऑनलाईन उपस्थित होते. डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांनी आभार मानले.

### औषधी वनस्पतींच्या पुनरुज्जीवनासाठी सहकार्य

■ शिवाजी विद्यापीठातर्फे डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ यांच्या संशोधकांना औषधी वनस्पतींचे जैवरासायनिक पृथःक्करण, औषधी वनस्पती तसेच जंगलात आढळणाऱ्या; पण संख्येने कमी प्रमाणात असणाऱ्या वनस्पतींचे टिश्यू कल्चरद्वारे पुनरुज्जीवन करण्यासाठी सहकार्य व मार्गदर्शन लाभणार आहे. भविष्यात दोन्ही विद्यापीठांच्या सहकार्याने विविध कार्यशाळा, व्याख्याने, चर्चासत्रे यांचे आयोजन केले जाईल.

सकाळ

# बी.एस्सी., बी.एड.चे विद्यापीठात अभ्यासक्रम

## प्रस्तावाला मान्यता; व्यवस्थापन परिषदेची बैठक

कोल्हापूर, ता. २३ : नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठ काही नवे अभ्यासक्रम सुरू करण्याच्या दिशेने पावले टाकत आहे. याअंतर्गत बी.एस्सी., बी.एड. अभ्यासक्रम सुरू करण्याच्या प्रस्तावाला आज विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.

या शैक्षणिक धोरणाअंतर्गत विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांना टप्प्याटप्याने स्वायत्तता मिळणार आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने विविध स्वरूपातील काही नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यात बीएस्सी बीएड अभ्यासक्रमाचा समावेश आहे. त्याची सुरूवात करण्यासाठी एनसीआरटीला पाठविण्यात येणाऱ्या प्रस्तावाला व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. आजीवन शिक्षणासह अन्य काही विभागांच्या संचालकपदाच्या युजीसीने ठरवून दिलेल्या निकषानुसार समकक्षतेबाबत पुढील कार्यवाहीचा प्रस्ताव मंजूर केला. राज्यातील विविध १५ अकृषी विद्यापीठे आणि शासनमान्य अभिमत विद्यापीठांतील शिक्षक, शिक्षक समकक्ष अशी ६५९ पदांच्या भरतीला शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने नोव्हेंबर २०२२ मध्ये मान्यता दिली.

त्यानुसार शिवाजी विद्यापीठाला ७२ पदांच्या भरतीसाठी मान्यता मिळाली. त्यात सहायक प्राध्यापकांची ६२, तर सहयोगी प्राध्यापकांची १० पदे आहेत. या पदांचे अधिविभागनिहाय रोस्टर तयार करून तपासणी, मान्यतेसाठीचा प्रस्ताव फेब्रुवारीमध्ये विद्यापीठ प्रशासनाने राज्य शासनाला पाठविला आहे. या पदांच्या भरतीच्या प्रस्तावाला व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता मिळाली. कोरोना काळात ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे निधन झाले. त्यांना आर्थिक मदतीचा हात देण्यासाठीचे प्रस्ताव सादर करण्यास दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.



## आतापर्यंत ५५१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

विद्यापीठाच्या ऑक्टोबर- नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ५६४ अभ्यासक्रमांपैकी ५५१ अभ्यासक्रमांचे निकाल आतापर्यंत जाहीर झाले आहेत. बी. एड., एम. एड., इंटिग्रेटेड सत्र पहिले, एम. फार्मा सत्र पहिले आणि दुसरे या अभ्यासक्रमांचे निकाल परीक्षा व मूल्यमापन मंडळाने सोमवारी जाहीर केले.

तरूण भारत

# बीएस्सी, बीएड एकात्मिक कोर्सचा ठराव मंजूर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील बीएस्सी, बीएड एकात्मिक कोर्ससाठी 'एनसीईआरटी' कडून मान्यता मिळविण्यासाठीचा ठराव शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मंजूर केला. या बैठकीला कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांची ऑनलाईन उपस्थिती होती. प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते. यासंदर्भात विद्यापीठ प्रशासनासी संपर्क साधला असता काहीच बोलणार नसल्याचे सांगितले.

व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विद्यापीठाकडून मंजूर ७२ पदापैंकी काही पदे आजीवन अध्ययन व संचालक पदाची आहेत, याबाबतच्या त्रुटी प्रस्तावास मान्यता दिली. कोरोना काळात विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने ज्या विद्यार्थ्यांचे पालक मृत्यू पावले आहेत त्यांना ७५ हजार रुपये देण्यात येत होते. काही संलग्न महाविद्यालयांची प्रस्ताव पाठविण्याची मागणी होती. ते प्रस्ताव पाठविण्यास पुन्हा दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. खरेदी-विक्री समितीने मांडलेल्या खरेदीचा विषय मोठा असल्याने पुढील बैठकीत त्यावर चर्चा करण्याचा निर्णय झाला.

तरूण भारत

# रियाजासाठी ध्यान आवश्यक

## तबलावादक डॉ. रविकिरण नाकोड यांचे मत



कोल्हापूर : संगीत नाट्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित कार्यशाळेत तबला वादन करताना डॉ. रविकिरण नाकोड व विद्यार्थी.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

तबला वादनासाठी एका जागी अधिक वेळ बसण्याचा सराव असावा. तसेच एकाच गोष्टीचा वारंवार रियाज करण्यासाठी ध्यान आवश्यक असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी ध्यान करण्याकडे लक्ष द्यावे. रियाजासाठी ध्यान आवश्यक असते, असे मत सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ कर्नाटकाच्या डिपार्टमेंट ऑफ म्युझिक ॲण्ड आर्टस येथील तबला प्रा. डॉ. रविकिरण नाकोड यांनी व्यक्त केले.

संगीत नाट्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित 'कन्सेप्ट्स ऑफ रियाज इन तबला' या विषयावर कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. डॉ. रविकिरण नाकोड हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व टॉप ग्रेडेड आर्टीस्ट आहेत. त्यांनी अनेक प्रतिष्ठित व्यासपीठांवरून एकल तबला वादन केले. त्याचबरोबर अनेक शास्त्रीय संगीतातील गायक, गायिकांना तसेच एकल वाद्य वादनाला साथसंगत केली. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी अनेक कायदे, पलटे, रियाजासाठी आवश्यक अक्षर साधना शिकविली. तसेच कार्यशाळेच्या शेवटी त्यांचे एकल वादनही झाले. प्रास्ताविक डॉ. निखिल भगत यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी केले. आभार अतुल परिट यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष

24 MAY 2023 **तरुण भारत** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरुणांनी राष्ट्रविकासात सहभाग घ्यावा

## प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचे प्रतिपादन : विद्यापीठात स्पर्धेचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

तरुण हे राष्ट्रीय शाश्वत विकासाचे 'ग्रोथ इंजिन' आहेत. त्यामुळे तरुणांनी मूल्याधिष्ठित जाणीवा मनाशी बाळगून राष्ट्रविकासाच्या कार्यात सहभाग घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात सोळाव्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेतर्गत राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा पार पडली. या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात अध्यक्षीय स्थानावरून ते बोलत होते. या स्पर्धेस निरीक्षक म्हणून केंद्रीय संसदीय कार्य मंत्रालयाचे उपसचिव ए. बी. आचार्य आणि शिक्षणतज्ज्ञ प्रा. एस. बी. देओसकर उपस्थित होते. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे व विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड मंचावर होते.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, राष्ट्रीय युवा संसद उपक्रमाच्या माध्यमातून सांविधानिक लोकशाहीची मूल्ये युवा पिढीमध्ये रुजविण्याच्या दिशेने केंद्रीय मंत्रालय अतिशय सकारात्मक प्रयत्न करीत आहे. देशातील सामाजिक समस्या सोडविण्याचा प्राधान्यक्रम आखला जाणे युवाकडून अभिप्रेत असते. त्यातच आता आपण जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्या आहोत. या डेमोग्राफिक डिव्हिडंडचा लाभ घेण्यासाठी आपण सातत्याने कार्यप्रवण राहण्याची आवश्यकता आहे, असेही त्यांनी सांगितले.

यंदा आपण 'स्वच्छ भारत' ही संकल्पना घेऊन हा उपक्रम साजरा करीत आहोत, तेव्हा केवळ भौतिक स्वच्छता करणे, यातून अभिप्रेत नसून स्वच्छतेचा संस्कार जनमानसात रुजणे आणि लोकांची परस्पराबद्दलची मनेही स्वच्छ व पारदर्शक होणे नितांत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी 'स्वच्छ भारत' शपथ घेतली. समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संतोष सुतार यांनी आभार मानले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोळाव्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील. डॉ. प्रल्हाद माने, प्रा. एस. बी. देओसकर, उपसचिव ए. बी. आचार्य, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. प्रकाश गायकवाड.**